**मार्गदर्शक सूचना**

जा.क्र.शेमासे/कृषिदिन/ ३५२ /१८
कृषि आयुक्ताल, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक -११/ ६/ २०१८

प्रती,

**विभागीय कृषि सहसंचालक** (सर्व)------------
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** (सर्व)---------------
**प्रकल्प संचालक (आत्मा)** (सर्व) ------------------
**कृषि विकास अधिकारी** (जिल्हा परिषद) (सर्व)-----------------

**विषय - महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची जयंती राज्यात दि. १ जुलै २०१८ कृषिदिन म्हणून साजरी करणेबाबत .....**

**संदर्भ -** कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक कृषिदि -०५१८/प्र.क्र. १०३/३अे दि.२४ मे २०१८

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी कृषि क्षेत्रात केलेल्या भरीव योगदानाबद्दल १ जुलै हा त्यांचा जन्मदिवस राज्यात कृषिदिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येतो. चालू वर्षी सुध्दा कृषिदिन साजरा करण्याबाबत शासनाने संदर्भीय शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जिल्हा आणि तालुका स्तरावर कृषिदिनाचे आयोजन करावे. कृषि दिनाच्या आयोजनाबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांच्या अधिनस्त असलेले जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) व कृषि विकास अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून विभागातील सर्व जिल्ह्यांच्या कार्यक्रमांचे नियोजन करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी.

**जिल्हास्तर-** कृषि दिनाच्या निमित्ताने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) आणि कृषि विकास अधिकारी यांनी पुढाकार घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करावे. त्यासाठी पालकमंत्री, जिल्ह्यातील सन्माननीय लोक प्रतिनिधी, जिल्हास्तरीय अधिकारी, आत्मातंर्गत शेतकरी सल्लागार समितीचे जिल्हास्तरीय सदस्य, प्रगतीशील शेतकरी यांना निमंत्रीत करावे. तसेच या कार्यक्रमामध्ये कृषि शास्त्रज्ञ, पुरस्कार प्राप्त शेतकरी यांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करावीत. या निमित्ताने जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. कृषिविषयक निबंध स्पर्धा, चित्रकलास्पर्धा इ. चे आयोजन करावे. तसेच १ जुलै २०१८ रोजी कै. वसंतरावजी नाईक यांच्या कृषि क्षेत्रातील योगदानाबाबत स्थानिक वृत्तपत्रांमध्ये माहितीपर लेख प्रसिध्दी करावेत.

**तालुकास्तर-** तालुका स्तरावरील कार्यक्रमाचे नियोजन करून व्यवस्थितरित्या कृषिदिन साजरा होईल यांची दक्षता उपविभागीय कृषि अधिकारी यांनी घ्यावी. त्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व तालुक्याच्या

ठिकाणी तालुका कृषि अधिकारी व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे मदतीने व समन्वयाने कार्यक्रमांचे नियोजन करून सदर कार्यक्रमाचे आयोजन तालुका मुख्यालयात करावे.

सदर कार्यक्रमास तालुका स्तरावरील सन्माननीय लोक प्रतिनिधी, प्रगतीशील शेतकरी, शेतकरी मित्र, तालुकास्तरीय इतर अधिकारी, आत्मातंर्गत स्थापन झालेल्या शेतकरी सल्लागार समितीचे तालुकास्तरीय सदस्य, तालुक्यातील शेतकरी उत्पादक कंपनी प्रतिनिधी यांना निमंत्रीत करावे. कार्यक्रमा निमित्त कृषि शास्त्रज्ञ, तालुक्यातील पुरस्कार प्राप्त पुरूष व महिला शेतकरी यांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजीत करावीत. कृषि माहिती विषयक चित्रफिती, प्रदर्शन, निबंध/चित्रकला स्पर्धा इत्यादिचे आयोजन करावे.

**खर्चाचा तपशील -** सन २०१८-१९ मध्ये प्रत्येक पंचायत समितीकरीता जास्तीत जास्त रू. ५०००/- याप्रमाणे ३५५ पंचायत समितीकरीता रू. १७७५०००/- तसेच जिल्हा परिषद मुख्यालयी कृषिदिन साजरा करणेसाठी प्रत्येक जिल्हा परिषदेकरीता रू. १०,०००/- याप्रमाणे एकूण ३४ जिल्हा परिषदांकरीता रू. ३४००००/- अशा एकूण रू. २११५०००/- (अक्षरी रूपये एकवीस लाख पंधरा हजार फक्त) एवढा खर्च जिल्हा परिषद सेस फंडातील उपलब्ध निधी मधून खर्च करण्यात यावा. सदर खर्च चित्रफिती दाखविणे, शेतकऱ्यांसाठी चहापाणी, जिल्हा परिषद स्तरावर छोटेसे प्रदर्शन इत्यादी खर्च आणि मंडप, हारतुरे, फोटो वगैरे आवश्यक बाबींकरिता खर्च करण्यात यावा. कृषि विकास अधिकारी यांनी जिल्हा सेस फंडातून खर्च करण्याकरता या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयुक्तालयात त्वरीत सादर करावा.

कृषि संचालक (विप्र)

कृषि आयुक्ताल, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत- १) मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

२) मा. आयुक्त कृषि, कक्ष, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव.

३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) ---------------- यांना माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव.

**महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांची जयंती राज्यात दि.१ जुलै, २०१८ रोजी कृषि दिन म्हणून साजरा करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- कृषिदि- ०५१८/प्र.क्र. १०३/३अे**
**मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :- २४ मे, २०१८**

**संदर्भ:-**

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. संकीर्ण-१०८९/प्र.क्र.३८/१२अे, दि.२१ जून,१९८९
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. कृषिवि-३८०९/प्र.क्र.१२३/३अे, दि.१२ जून,२००९
३) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. कृषिवि-३८११/प्र.क्र.१२७/३अे, दि.२२ जून,२०११
४) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.शेमासे/कृषिदिन/ दि.१ जुलै/३२४/१८, दि.२३ एप्रिल, २०१८

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी कृषि क्षेत्रात केलेली भरीव कामगिरी लक्षात घेवून त्यांची जयंती दि.१ जुलै रोजी राज्यात कृषि दिन म्हणून साजरी करण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

दि.१ जुलै, २०१८ रोजी राज्यात प्रतीवर्षीप्रमाणे कृषि दिन म्हणून साजरा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. कृषि दिनानिमित्त प्रत्येक पंचायत समितीकरीता जास्तीत जास्त रु. ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) यानुसार ३५५ पंचायत समित्यांकरिता रु. १७,७५,०००/- (रुपये सतरा लाख पंच्च्याहत्तर हजार फक्त) तसेच जिल्हा परिषद मुख्यालयी कृषिदिन साजरा करण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेकरीता रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) या प्रमाणे एकूण ३४ जिल्हा परिषदांकरीता रु. ३,४०,०००/- (रुपये तीन लाख चाळीस हजार फक्त) अशा एकूण रु. २१,१५,०००/- (रुपये एकवीस लाख पंधरा हजार फक्त) एवढया खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. कृषि दिन साजरा करण्याबाबत मार्गदर्शक सूचना आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संबंधितांना द्याव्यात. कृषि आयुक्तांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांतील बाबीवर सदर खर्च करण्यात यावा. तसेच चित्रफिती दाखविणे, शेतकऱ्यांसाठी चहापाणी, जिल्हा परिषद स्तरावर छोटेसे प्रदर्शन इत्यादी खर्च आणि मंडप, हारतुरे, फोटो वगैरे आवश्यक बाबींकरिता खर्च करण्यात यावा.

३. या प्रित्यर्थ येणारा खर्च जिल्हा परिषद सेस फंडातील उपलब्ध असलेल्या अनुदानातून करण्यात यावा. हा खर्च भागविण्याकरिता सर्व जिल्हयातील मुख्य कार्यकारी अधिकारी व कृषि अधिकारी यांनी जिल्हा सेस फंडातून खर्च करण्याकरीता आयुक्त (कृषि) यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करावी. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२४१११५१२७९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(च.वि.घायतडक)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव
२) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
५) मा.राज्यमंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव
६) सर्व कृषि विद्यापीठांचे कुलगुरु
७) कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ,अकोला
९) व्यवस्थापकयीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबई
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई प्रसिध्दीच्या विनंतीसह (५ प्रती)
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई, महाराष्ट्र -२ नागपूर.
१२) महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई, महाराष्ट्र -२ नागपूर
१३) सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ / विधान मंडळ ग्रंथालय (१० प्रतीसह)
१४) सर्व जिल्हाधिकारी
१५) सर्व जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१६) सर्व विभागीय आयुक्त
१७) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९) सर्व कृषि सहसंचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०) सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२१) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२२) सर्व तालुका कृषि अधिकारी
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२४) सर्व सहसचिव / उपसचिव , कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
२५) वसंतराव नाईक, राज्य कृषि व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर
२६) वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
२७) निवडनस्ती (३ अे)